# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र १२२ दिनांक- ०८/०५/२०२१

**मानसी ऑर्केस्ट्रा रेस्टॉरंट अँण्ड बारवर काशिमीरा पोलीसांची कारवाई. ग्राहकांसह एकुण १९ जणांना केली अटक**

दि. ०८/०५/२०२१ रोजी मौजे पहाटे ०३.०० वाजताचे सुमारास पोलीस निरीक्षक, श्री. संजय हजारे यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरुन मौजे मिरारोड पुर्व, मिरागांव, अमरपॅलेस नाका, येथील मानसी ऑर्केस्ट्रा बार अँण्ड रेस्टारंट नावाचे हॉटेलमध्ये हॉटेलचे मालक श्याम कोरडे, रवी शेट्टी यांनी आपसात संगनमताने हॉटेलमध्ये काम करणाऱ्या मुलींना लपण्याकरीता जागा तयार करुन ज्यामध्ये मुलींचा मृत्यू ओढावु शकतो याची जाणीव असतांना देखील हवा, पाणी, लाईटची व्यवस्था नसलेला कॅविटी रुम बनविली.सदर ठिकाणी ६ महीला/मुली व १ तृतीयपंथी यांना बोलावुन घेवुन, हॉटेलचा स्टाफ विशाल पवन पाठक, तिमआप्पा मच्छींद्र जोगी ऊर्फ महेश अण्णा, गोपाल बोबे गौडा, श्रीनिवास बिरा गौडा, रितेश टेकोसाव सोनी, डाबोर रामचंद्र सियाल यांनी मिळुन ४ मुलींना नमुद रुममध्ये लपविले, तसेच २ मुली व १ तृतीयपंथी यांना गाण्याच्या कर्कष आवाजावर तोकडे कपडे घालुन, स्टेजचे खालील बाजुस ग्राहकांचे जवळ डांस करण्यास भाग पाडुन, प्रोत्साहन देवुन, ग्राहकांना विनापरवाना दारु व खादय पदार्थ पुरवुन, विनापरवाना हॉटेल चालु ठेवले.

सदर ठिकाणी काशिमीरा पोलीसांनी छापा कारवाई केली असता (१) आशिष सुरेश जोशी, (२) शैलेश शांताराम झगडे, (३) सुभाष श्रवण झा, (४) चिराग रजनीकांत शाह, (५) मयुर विजय दाभोळकर, (६) परेश भुपेंद्र मुजीद्रा, (७) मौलिंक राजेंद्रभाई शहा, (८) जिग्नेश विक्रम शहा, (९) देवीशंकर रामदैाड यादव, (१०) प्रकाश शया गणावत, (११) रुपेश भवरलाल राठोड, (१२) भावेश प्रकाश पारेख, (१३) राजेश तानाजी घारे यांनी चलनी नोटा उडवित असताना मिळून आले. कोविड-१९ आजाराचे पार्श्वभुमीवर हॉटेलला बंदी घालण्यात आली असतांना देखील हॉटेल उघडुन सर्व एकत्रीत जमुन कोरोना आजाराचा घातक संसर्ग पसरविण्याची हयगईची कृती करत होते.

सदर प्रकरणी काशिमीरा पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद क्रमांक I ३७१/२०२१ भादवि कलम ३०८, २६९, २७०, ३४ सह महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मदयपान कक्ष (बार रुम) यामधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालणेबाबत व (त्यामध्ये काम करणाया) महीलांचे प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ चे कलम ३, ८(१),(२),(४), महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम ६५(ई), मुंबई पोलीस कायदा कलम ३३(डब्लु), महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना अधिनियम कलम ११, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१, साथ रोग अधिनियम कलम २, ३, ४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन, एकुण १९ आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयात एकुण रोख रक्कम १,९१,५५०/- रुपये, वादय वाजविण्याचे उपयोगाचे १०,०००/- रुपये किमंतीचे यामाहा कंपनीचे मिक्सींग कनसोल मशीन, ६९,४७०/- रुपये किमंतीचा देशी विदेशी दारुचा साठा, आरोपीतांचे मोबाईल असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयातील पाहीजे आरोपी हॉटेलचे मालक (१) श्याम कोरडे, (२) रवि शेटटी यांचा शोध पोलीस घेत आहेत. गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१. श्री. विलास सानप मा. सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, श्री संजय हजारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस स्टेशन व सपोनि/महेंद्र भामरे, सपोउनि/राजेश पानसरे, पोहवा/दिनकर कोल्हे, पोशि/जयदीप बडे, पोशि/जयकुमार राठोड, पोशि/अनिल नागरे, मपोशि/ स्वाती देठे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner